# NCC Annual Report-2023-24

**शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता महाविद्यालयाच्या एनसीसी (नेव्हल व आर्मी) विभागामध्ये खालीलप्रमाणे कडेट्सची नोंदणी झाली.**

| NAVAL NCC | SD (Boys) | SW (Girls) | Total |
|---|---|---|---|
| 1st year | 21 | 13 | 34 |
| 2nd year | 08 | 01 | 09 |
| 3rd year | 04 | 03 | 07 |
| **Total** | | | **50** |

| ARMY NCC | SD (Boys) | SW (Girls) | Total |
|---|---|---|---|
| 1st year | 07 | 12 | 19 |
| 2nd year | 09 | 13 | 22 |
| 3rd year | 04 | 09 | 13 |
| **Total** | | | **54** |

आर्मी तसेच नेव्हल विभागातील कडेट्सनी नेहमीप्रमाणेच यंदाही विविध वार्षिक कॅम्प तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावरील कॅम्प जसेकी, आर्मी अटॅचमेंट, सी ट्रेनिंग, शिप अटॅचमेंट, स्कूबा डायव्हिंग, याचिंग, शूटिंग निवड, सागरी मोहीम, एक भारत श्रेष्ठ भारत, बेसिक व एडवांस्ड लीडरशिप कॅम्प मध्ये आपला सहभाग नोंदविला.

NEP-2020 अंतर्गत प्रथम वर्ष कला वाणिज्य विज्ञान वर्गासाठी सहशैक्षणिक विषय म्हणून एनसीसी यंदापासून शिकविण्यात येत आहे.

महाविद्यालयाच्या १० मी. एयर रायफल शूटिंग रेंज मध्ये एनसीसी कडेट्सचा नियमित सराव घेण्यात येत आहे. तसेच २०२४ च्या इंटर डिरेक्टरेट (राष्ट्रीय स्तर) शूटिंग स्पर्धेसाठी पुणे येथे झालेल्या निवड चाचणीमध्ये दोन निवडीतून पुढे जात पहिल्यांदाच आपल्या कडेट्ना सहभाग घेता आला.

नोवेंबर महिन्यामध्ये मालवण येथे नेव्ही दिन समारंभाच्या निमित्त आयोजित युद्ध प्रात्यक्षिके पाहण्यासाठी महाविद्यालयातील कडेट्स सहभागी झाले होते.

प्रत्यक्ष कामाचा व जबाबदारी सांभाळण्याचा अनुभव यावा यासाठी आपले कडेट्सना महाविद्यालया मार्फत विविध उपक्रमांमध्ये सहभागाची संधी दिली जाते. या अंतर्गत आपले कडेट्स खालील उपक्रमांमध्ये सहभागी झाले.

शासनाच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये स्व-संरक्षण प्रशिक्षण देण्याच्या योजनेअंतर्गत, कमवा व शिका या माध्यमातून एनसीसी कडेट्स सहभागी झाले

१४ व १५ जानेवारी २०२४ दरम्यान तालुक्यातील मारलेश्वर यात्रेमध्ये पोलिस मित्र म्हणून आपल्या कडेट्स नी वाहतूक व्यवस्थेमध्ये पोलिसांच्या मदतीला जाऊन अनुभव घेतला.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी आपल्या कडेट्सनी आपापल्या गावांमध्ये निवडणूक मदतनीस स्वयंसेवक म्हणून प्रशासनाला मदतीचे कार्य केले.

शालेय विद्यार्थ्यांच्या साठी घेण्यात येणाऱ्या "मंथन" परीक्षेकरिता तालुका स्तरीय केंद्रामध्ये आपल्या कडेट्सनी पर्यवेक्षक म्हणून काम पहिले.

आपल्या कडेट्सनी दि. २९ डिसेंबर २०२३ रोजी नगरपंचयात देवरुख च्या संयुक्त विद्यमाने सप्तलिंगी नदीवर दोन ठिकाणी बंधारा बांधला.

दि. १ ऑक्टोबर २०२३ रोजी महाविद्यालय आणि परिसरामध्ये कडेट्स मार्फत स्वच्छता दिन तसेच प्लॅस्टिक मुक्त भारत अभियानानिमित्त स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

याचप्रमाणे एनसीसी विभागातर्फे कारगिल विजय दिवस, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन तसेच १४ फेब्रुवरी २०२४ रोजी शाहिद मानवंदना दिन साजरा करण्यात आले.

महाविद्यालयातील आर्मी एनसीसी विभागाचे कामकाज सौ. सानिका भालेकर तसेच नेव्हल विभागाचे कामकाज सब. ले. उदय भाटये हे पाहतात.